महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय.
दिनांक:- ९ जानेवारी १९९६.

प्रति,

१] ~~विभागीय सहनिबंधक सह. संस्था~~
मुंबई/ पुणे.

२] जिल्हा उपनिबंधक सह. संस्था
मुंबई[१], [२], व[३]
ठाणे/ पुणे.

३] तालुका उप/सहाय्यक निबंधक सह. संस्था
मुंबई/ पुणे/ ठाणे जिल्हयातील सर्व
तालुके/ वार्ड.

विषय:- सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या तक्रारी संबंधी
त्वरीत अंतीम कार्यवाही होणेबद्दल...

मुंबई आणि पुण्यातील गृहनिर्माण सहकारी संस्थांसंबंधी अनेक तक्रारी या कार्यालयाकडे तसेच शासनाकडे येत असतात. यातील बहुतांश तक्रारी वरुन तालुका उप/सहाय्यक निबंधक यांचे पातळीवर वेळीच कार्यवाही न झाल्यामुळे या कार्यालयाकडे तसेच शासनाकडे तक्रारकर्ते धाव घेतात असे दिसून येते. या कार्यालयाकडे आलेल्या तक्रारीवर संबंधीत तालुका उप/सहाय्यक निबंधक यांचेकडे तक्रारीवर चौकशी करुन कायद्यातील तरतूदीप्रमाणे त्वरीत कार्यवाही करावी असे कळविले जाते. मात्र अनेक तालुका अधिकारी या तक्रारीकडे गांभीर्याने लक्ष देत नाही आणि या तक्रारी बराच दिर्घकाळ प्रलंबीत रहातात. तालुका अधिका-यांनी की ज्यांना महाराष्ट्र सहकारी कायद्यातील सहकारी गृहनिर्माण संस्था संबंधी जे अधिकार आहेत ते लक्षात घेता वेळीच योग्य ती कार्यवाही केली तर शासनाकडे किंवा या कार्यालयाकडे तक्रार कर्त्यांना धाव घ्यावी लागणार नाही. तालुका उप/सहाय्यक निबंधक हे तक्रारीवर वेळीच कार्यवाही करीत नसल्यामुळे आणि तक्रारीवर अंतीम कार्यवाहीत विलंब झाल्यामुळे तक्रारकर्ते परत परत वरिष्ठ कार्यालयाकडे लिहितात. प्रशासनाच्या दृष्टीने ही बाब अशोभनीय आहे.

वरील परिस्थितीत सुधारणा व्हावी म्हणून मा. सहकार आयुक्त यांनी पुणे आणि मुंबई येथे दरमहा १ दिवस प्रलंबीत तक्रारींचा आढावा घ्यावयाचे ठरविले आहे. त्या आढाव्याच्या वेळी संबंधीत तालुका अधिकारी यांनी प्रकरणातील सर्व कागदपत्रे घेऊन हजर रहावयाचे आहे. तसेच आवश्यकतेनुसार

..२

तक्रारदारासही हजर रहाण्यास कळवावयाचे आहे. तक्रारीवरील कार्यवाहीस अंतीम स्वरुप देण्यासाठी आणि अंतीम कार्यवाही वेळेत होण्यासाठी असा आढावा घ्यावयाचे मा. आयुक्तांनी ठरविले आहे. प्रत्येक महिन्याचा दुसरा मंगळवार मुंबई येथे आणि चौथा मंगळवार पुणे येथे हा आढावा घेण्यात येईल तरी सर्व अधिकाऱ्यांनी त्यांचेकडे प्रलंबीत असलेल्या तक्रारीवर त्वरेने अंतीम कार्यवाही करावी. तक्रारी प्रलंबीत रहाण्यास कुणीही अधिकारी कारणीभूत आहे असे दिसून आल्यास गंभीर दखल घेतली जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, मुंबई आणि विभागीय सहनिबंधक सह. संस्था, पुणे यांनी दर आठवड्याला एकदा तक्रारीचा आढावा घेण्याची पद्धत या कार्यालयाच्या सूचनेवरुन सुरु केलेली आहे. ती सुरु ठेवावी आणि प्रत्येक प्रकरणात अंतीम कार्यवाही त्वरेने होईल याकडे विभागीय सहनिबंधक आणि जिल्हा उपनिबंधक यांनी कटाक्षाने पहावे.

सही/-
[रत्नाकर कुलकर्णी]
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे १.

प्रत:- योग्य त्या कार्यवाहीस्तव:-

१] विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, नाशिक/औरंगाबाद/अमरावती/व नागपूर.

२] जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था [सर्व]

Valkar
६/७/९५.

सहकार आयुक्त व निबंधक सह. संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे करिता.